महाराष्ट्र शासन

# सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण पुणे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, स.नं.१०४/१०५, विश्रांतवाडी रोड, पोलिस स्टे शन समोर, येरवडा पुणे
दुरध्वनी व फॅक्स क्र.०२० २९७०६६११ E-mail:-adobcpune@gmail.com

---

जा.क्र.ससं/इमाबक/भासशि/विजाभज-इमाव-विमाप्र/शावगृ-आधार-स्वयंम/२०२५-२६/९२७ दि.०१/०८/२०२५

प्रति,
प्राचार्य,
अनुदानित / कायम विनाअनुदानित बिगर व्यावसायिक,
व्यावसायिक महाविद्यालये (सर्व),
पुणे जिल्हा.

विषय : शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ करिता **"शासकीय वसतिगृह योजना" "ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना"** व **"पंडीत दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना"** अंतर्गत अर्ज सादर करणेबाबतची माहिती महाविद्यालयाच्या दर्शनी भागावर प्रसिध्द करणेबाबत

संदर्भ : १. इतर मागास बहुजन कल्याण, मंत्रालय मुंबई, शासन निर्णय दि.२९.११.२०२२
२. इतर मागास बहुजन कल्याण, मंत्रालय मुंबई, शासन निर्णय दि.१३.१२.२०२३
३. इतर मागास बहुजन कल्याण, मंत्रालय मुंबई, शासन निर्णय दि.११.०३.२०२४
४. इतर मागास बहुजन कल्याण, मंत्रालय मुंबई, शासन निर्णय दि.०६.०९.२०१९
५. इतर मागास बहुजन कल्याण, मंत्रालय मुंबई, शासन निर्णय दि.२१.०६.२०२४
६. मा. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. ३८६३ दिनांक ३०/०७/२०२५.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या शासकीय वसतीगृह प्रवेशासाठी, तसेच वसतीगृह योजनेंपासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना या अंतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश अर्ज मागविण्याबाबत संदर्भीय पत्र क्र.६ अन्वये निर्देश प्राप्त झाले आहेत.

जिल्ह्यातील उच्च व तंत्र शिक्षण संस्थामध्ये प्रवेश घेतलेल्या इतर मागासवर्ग (इमाव), विमुक्त जाती भटक्या जमाती (विजाभज), विशेष मागास प्रवर्ग (विमाप्र), अनाथ, दिव्यांग व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (आ.दु.घ) विद्यार्थ्यांसाठी शासन मान्य आरक्षणानुसार प्रवेश दिला जाणार आहे. **प्रथम टप्प्यामध्ये** इयत्ता १२ वी उत्तीर्ण होऊन बी.ए., बी.कॉम., बी.एससी. अशा पदवी अभ्यासक्रमांमध्ये किंवा एम.ए., एम.एससी. (व्यावसायिक अभ्यासक्रम वगळता) या पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज करावयाचे आहेत.

## शासकीय वसतीगृहाचे सन २०२५-२०२६ साठीचे प्रवेशाचे वेळापत्रक

| बाब | प्रवेशासाठी अर्ज करावयाचा कालावधी | अर्ज छाननी करावयाचा कालावधी | पहिली निवड यादी गुणवत्तेनुसार अंतिम करणे व प्रसिध्द करणे | पहिल्या निवड यादीनुसार प्रवेशाची अंतिम मुदत | रिक्त जागेवर दुसऱ्या प्रतिक्षा यादीमधील विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार निवड यादी प्रसिध्द करणे | दुसऱ्या निवड यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशांची अंतिम मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| बी.ए./बी.कॉम/बी.एस.सी अशा १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या पदवी आणि एम.ए./एम.एस.सी. असे पदवी नंतरचे पदव्युत्तर अभ्यासक्रम (व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून) | दि. १.८.२०२५ ते १७.८.२०२५ | दि. १८.८.२०२५ ते २१.८.२०२५ | दि. २२.८.२०२५ | दि.४.९.२०२५ | दि.५.९.२०२५ | दि.१५.९.२०२५ |

तसेच आदिवासी विकास विभागाच्या पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेच्या धर्तीवर शासकीय वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या **भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाच्या** विदयार्थ्यांकरिता पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना राबविण्यास संदर्भ क्र. ४ व ५ मधील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली असून सदरच्या शासन निर्णयात दिलेल्या सुचनांनुसार अर्ज सादर करावे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वाधार योजनेच्या धर्तीवर इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती (भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाचे विद्यार्थी वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता **"ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना"** राबविण्यास संदर्भिय शासन निर्णय क्र.२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करताना संदर्भिय शासन निर्णय क्र. २ व ३ मधील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये इतर मागास बहुजन कल्याण विभागाअंतर्गत असलेले शासकीय वसतीगृह प्रवेशासाठी तसेच पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेअंतर्गत अर्ज करण्यासाठी, https://hmas.mahait.org **या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करून** अर्ज सादर करणेबाबत शासनाचे निर्देश आहेत.

तरी शासकीय वसतिगृह योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना शासनामार्फत देण्यात आलेल्या सर्व सुचनांबाबत अवगत करावे व संबंधित विद्यार्थ्यांना अर्ज करण्यातकरिता आपले स्तरावरून सर्वतोपरी सहकार्य करावे.

(प्रदिप संकपाळ)
सहाय्यक संचालक
इतर मागास बहुजन कल्याण पुणे

**प्रत – माहितीस्तव सविनय सादर:-**

१.मा.संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, म.रा पुणे.

२. मा.प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक) विभाग, पुणे.